आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१६ जानेवारी २०२५ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- सिंगापूरचे राष्ट्रपती थर्मन षण्मुगरत्नम यांचं आज राष्ट्रपती भवनात समारंभपूर्वक स्वागत
- केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज देशातल्या सात विमानतळांवरच्या जलदगती इमिग्रेशन यंत्रणेचं उद्घाटन करणार
- अभिनेता सैफ अली खान याच्यावर चाकू हल्ला, तपासासाठी पोलिसांच्या १५ पथकांची स्थापना
- इस्रोच्या स्पेडेक्स मोहिमेअंतर्गंत अंतराळात दोन उपग्रहांची यशस्वी जोडणी **आणि**
- इस्रायल आणि हमास यांची युद्धबंदीसाठी सहमती

<><><><><>

राष्ट्रपती दौपदी मुर्मु यांनी सिंगापूरचे राष्ट्रपती थर्मन षण्मुगरत्नम यांचं आज राष्ट्रपती भवनात समारंभपूर्वक स्वागत केलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यावेळी उपस्थित होते. दोन्ही देश डिजीटल तंत्रज्ञान क्षेत्रात नव्या वाटेवर वाटचाल करत आहेत. गुजरातची गिफ्ट सिटी आणि सिंगापूर दरम्यान अपांरपरिक ऊर्जा निर्मितीचा कॉरिडॉर सुरु होणार असून दोन्ही देश व्यापक परस्पर सहकार्य धोरण, सेमीकंडक्टर निर्मितीत सहकार्य त्याचप्रमाणे उत्पादन आणि औद्योगिक पार्कच्या निर्मितीत एकत्र येतील, असं सिंगापूरचे राष्ट्रपती थर्मन षण्मुगरत्नम प्रसारमाध्यमांशी बोलताना म्हणाले.

भारत १९६५ साली स्वतंत्र सिंगापूरला पाठिंबा देणाऱ्या देशांमध्ये होता याचं स्मरणही त्यांनी यावेळी केलं.  षण्मुगरत्नम पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर आहेत.

त्यांच्यासोबत मंत्री, संसद सदस्य आणि अधिकाऱ्यांसह उच्चस्तरीय शिष्टमंडळ आहे. सिंगापूरचे अध्यक्ष म्हणून त्यांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. अध्यक्ष षण्मुगरत्नम शुक्रवार आणि शनिवारी ओदिशालाही भेट देतील. त्यांच्या भेटीमुळे दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांना आणखी गती मिळेल अशी अपेक्षा आहे.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज मुंबई, चेन्नई, कोलकाता, बंगळुरू, हैदराबाद, कोचिन आणि अहमदाबाद विमानतळांवर जलदगती इमिग्रेशन यंत्रणेचं उद्घाटन करणार आहेत. या यंत्रणेमुळे प्रवाशांना जागतिक दर्जाच्या इमिग्रेशन सुविधा मिळणार आहेत, त्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रवास सहज आणि विनाअडथळा होण्यासाठी मदत होणार आहे. या यंत्रणेनुसार प्रवाशांना ftittp.mha.gov.in या संकेतस्थळावर त्यांचे तपशील भरावे लागतील आणि आवश्यक कागदपत्रं अपलोड करावी लागतील.

नोंदणीकृत प्रवाशांचे बायोमेट्रिक तपशील परदेशी विभागीय नोंदणी कार्यालयांमध्ये किंवा परदेशांमधल्या विमानतळांवर नोंदवले जातील. प्रवाशांनी त्यांचे बोर्डिंग पास आणि पासपोर्ट विमानतळांवर स्कॅन केल्यानंतर प्रवाशांच्या बायोमेट्रिक तपशीलांची वैधता तपासून बघितली जाईल. ही प्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्यानंतर ई-गेट आपोआप उघडले जातील आणि त्यांचे इमिग्रेशन झाल्याचे सूचित केले जाईल. या प्रणालीची अंमलबजावणी देशातील २१ विमानतळांवर केली जाणार आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या स्टार्ट अप इंडिया या योजनेला आज ९ वर्षं पूर्ण होत आहेत. या निमित्ताने प्रधानमंत्र्यांनी समाज

माध्यमावर विशेष संदेश लिहिला आहे. सरकारने देशात स्टार्टअपला प्रोत्साहन देण्यासाठी सर्वतोपरी साहाय्य केल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. सरकारच्या गेल्या नऊ वर्षांतल्या धोरणांमुळे असंख्य तरुणांना सक्षम केलं असून त्यांच्या कल्पनांना वास्तवात आणलं आहे, असंही मोदी म्हणाले आहेत.

<><><><><>

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने पाच उमेदवारांची चौथी यादी आज जाहीर केली. बवाना मतदारसंघातून सुरेंदर कुमार, करोल बागमधून राहुल धनक निवडणूक लढणार आहेत. सुरेश गुप्ता हे रोहिणी मतदारसंघातून, तुघलकाबाद इथून विरेंदर बिधुरी आणि बद्रापूर इथून अर्जुन भदाना निवडणूक लढणार आहेत. त्याआधी मंगळवारी काँग्रेसने सोळा उमेदवारांची तिसरी यादी जाहीर केली होती. काँग्रेसने आतापर्यंत ६८ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले आहेत. दिल्ली विधानसभेची निवडणूक ५ फेब्रुवारी रोजी होणार आहे.

<><><><><>

अभिनेता सैफ अली खान याच्यावर मुंबईतल्या राहत्या घरी हल्ला झाला. सैफला लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आलं. त्याच्यावर सहा वार करण्यात आले असून त्यातल्या दोन जखमा खोल आहेत. त्यामुळे सैफ अली खानवर शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती रुग्णालयाच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे. आज पहाटे सैफ अली खान याच्या घरी दरोड्याचा प्रयत्न झाला होता. दरोडा रोखण्याच्या प्रयत्नात असताना सैफवर चाकूने हल्ला झाला. उपचारांनंतर त्याची प्रकृती स्थिर असून जिवाचा धोका टळल्याची माहिती त्याच्या अधिकृत सूत्रांनी दिली आहे.

या हल्ल्याचा तपास करण्यासाठी पोलिसांच्या एकूण १५ पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यात मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेच्या ८ आणि मुंबई पोलिसांच्या ७ पथकांचा समावेश आहे.

<><><><><>

पंजाब सरकार शहीद भगतसिंह यांच्या मूळ गावी वारसा मार्गाची निर्मिती करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री भगवंत मान यांनी काल केली. संग्रहालयापासून भगतसिंहांच्या वडिलोपार्जित घरापर्यंत ८५० मीटरचा रस्ता तयार करण्यात येणार आहे, असं मान यांनी सांगितलं. यामुळे देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातलं राज्याचं योगदान अधोरेखित होईल आणि तरुणांना देशासासाठी काम करायला प्रेरणा मिळेल असं मान म्हणाले.

<><><><><>

इस्रो अर्थात भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या स्पेडेक्स मोहिमेअंतर्गत आज अंतराळात दोन उपग्रहांची यशस्वी जोडणी करण्यात आली. असा प्रयोग करणारा भारत जगातील चौथा देश बनला आहे. या यशाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इस्रोचं आणि संशोधकांच्या संपूर्ण चमूचं अभिनंदन केलं आहे. इस्रोनं मिळवलेलं हे यश आगामी अंतराळ मोहिमांसाठी अत्यंत महत्त्वाचं पाऊल असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशात म्हटलं आहे.

इस्रोच्या संशोधकांनी साध्य केलेलं यश हे अतिशय अभिमानास्पद असल्याची भावना केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांनी व्यक्त केली. अंतराळात दोन उपग्रहांची जोडणी करण्याचं हे तंत्रज्ञान संपूर्ण स्वदेशी बनावटीचं असल्याचं सिंह यांनी नमूद केलं. हे तंत्रज्ञान भारतीय अंतराळ स्थानक,

चंद्रयान ४ आणि गगनयान या महत्त्वाकांक्षी मोहिमांसाठी अत्यंत महत्त्वाचं असल्याचंही त्यांनी म्हटलं.

<><><><><>

इस्रायल आणि हमास यांनी युद्धबंदीला सहमती दर्शवली आहे. कतारचे प्रधानमंत्री मोहंमद बिन अब्दुल रेहमान अल-थानी यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर या कराराचं स्वरूप निश्चित करण्यात आलं. या कराराची अंमलबजावणी रविवारपासून होणार असून ही युद्धबंदी ४२ दिवसांची असेल. अल थानी यांनी काल दोहामध्ये या कराराबाबत माहिती दिली.

या करारामुळे इस्रायलच्या ओलिसांची मुक्तता केली जाईल आणि गाझामध्ये मानवतावादी मदतीला चालना मिळेल. इस्रायलमधल्या माध्यमांनी दिलेल्या माहितीनुसार, आज मंत्रिमंडळाच्या सुरक्षाविषयक समितीची बैठक होऊन या कराराला मान्यता दिली जाईल. हमासनं दोहामध्ये मध्यस्थांबरोबरच्या चर्चेत कराराच्या मसुद्याला मान्यता दिल्याचं हमास संघटनेकडून सांगण्यात आलं.

युरोपियन महासंघाने गाझामधल्या या कराराचं स्वागत केलं असून दोन्हीकडून याची अंमलबजावणी करण्याचं आवाहन केलं आहे. भारतानेही या कराराचं स्वागत केलं आहे. या करारामुळे गाझा पट्टीतल्या लोकांना मदतीची हमी आणि सुरक्षितता मिळेल, भारताने या युद्धातल्या ओलिसांच्या सुटकेचा आणि युद्धबंदीचा कायम आग्रह धरल्याचंही परराष्ट्र मंत्रालयाने म्हटलं आहे.

<><><><><>

प्रयागराज इथं सुरू असलेल्या महाकुंभ मेळ्यातून संस्कृती आणि भक्तीबरोबरच पर्यावरण संवर्धनही केलं जात आहे. ३१ जानेवारीला हरित महाकुंभ मेळ्याचं आयोजन केलं आहे. देशात पर्यावरण आणि जल संवर्धनासाठी काम करणारे एक हजारांहून अधिक कार्यकर्ते या दिवशी प्रयागराजला येणार आहेत.

यावेळी निसर्ग, पर्यावरण, जल आणि स्वच्छता हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवत राष्ट्रीय पातळीवर चर्चासत्र होणार आहे.

<><><><><>

छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्यात IEDचा स्फोट होऊन सीआरपीएफचे चार जवान जखमी झाले. बसगुंडा भागात सुरक्षा दलाची संयुक्त कारवाई सुरू होती त्यावेळी हा स्फोट झाला.

<><><><><>

पश्चिम बंगालमध्ये काल एका संशयित आरोपीने केलेल्या हल्ल्यात दोन पोलीस कर्मचारी जखमी झाले. या संशयितासह इतर दोघांना राजगंज इथल्या सुधारगृहात नेत असताना त्यानं पोलिसांची बंदूक हिसकावून घेतली आणि त्यांच्यावर गोळीबार केला. या घटनेत जखमी झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांवर उपचार सुरू आहेत.

<><><><><>

वर्ष २०२६ पर्यंत जागतिक पातळीवर तेलाची मागणी १४ लाख ३० हजार बॅरल प्रति दिवस या दराने वाढून १ हजार ६६ लाख बॅरल प्रति दिवस इतकी होईल, असा अंदाज पेट्रोलियम निर्यातदार देशांची संघटना 'ओपेक'ने वर्तवला आहे.

या वर्षी ही मागणी १४ लाख ५० हजार बॅरल प्रति दिवस या दराने वाढण्याचा ‘ओपेक’चा अंदाज आहे.

जगातल्या मोठ्या अर्थव्यवस्थांच्या वृद्धीच्या आधारे जागतिक अर्थव्यवस्था या वर्षी ३ पूर्णांक १ दशांश टक्क्याने, तर पुढच्या वर्षी ३ पूर्णांक २ दशांश टक्क्यांनी वाढेल, असा अंदाजही ‘ओपेक’च्या एका अहवालात वर्तवण्यात आला आहे.

**<><><><><>**

ऑस्ट्रेलियन खुल्या टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा एन. श्रीराम बालाजी आणि त्याचा मेक्सिकोचा जोडीदार यांनी पुरुष एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. त्यांनी प्रतिस्पर्धी जोडीवर ६-४, ६-३ अशी सहज मात केली. बालाजी हा या स्पर्धेत टिकून असलेला एकमेव भारतीय टेनिसपटू आहे.